मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# पिंपरी-चिंचवडकरांना आता मिळणार नैसर्गिक आपत्तीची पूर्वसूचना

**महानगरपालिका आणि भारतीय हवामान विज्ञान विभाग यांच्यामध्ये सामंजस्य करार : हवामान बदलातील विविध आव्हाने सक्षमपणे हाताळण्यासाठी हा करार महत्त्वपूर्ण ठरणार**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराचे बदलते हवामान, प्रदूषण व्यवस्थापन, नैसर्गिक आपत्तीची पूर्वसूचना व त्यांचे परिणाम, आपत्ती व्यवस्थापन करताना राबविल्या जाणाऱ्या उपाययोजना याबाबत माहितीची देवाण घेवाण करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि भारतीय हवामान विज्ञान विभाग (आयएमडी) यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. हवामान बदलातील विविध आव्हाने सक्षमपणे हाताळण्यासाठी हा करार महत्त्वपूर्ण ठरणार आहे.



निगडी येथील दुर्गादेवी टेकडी येथे हवामान बदलाचे संकेत देणारा अत्याधुनिक एक्स-बँड डॉप्लर वेदर रडार मनोरा उभारण्यात येणार आहे. या ठिकाणी निश्चित केलेल्या जागेची पाहणी महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि पुणे येथील भारतीय हवामान विज्ञान विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ के. एस. होसाळीकर यांनी केली. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, मनोज सेठिया, उदय जरांडे, ओमप्रकाश बहिवाल, उमेश ढाकणे, किरण गायकवाड, योगेश वाळूंज तसेच भारतीय हवामान विज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ उदय शेंडे, डॉ. शिजो झकारिया, अश्विन राजू डी. के आदी उपस्थित होते. रडार प्रणाली उभारण्यासाठी महापालिकेद्वारे जागा उपलब्ध करून देण्यात आली असून हवामान विभागामार्फत त्या ठिकाणी रडार उभारण्यात येणार आहे.

जागतिक स्तरावरील हवामान झपाट्याने बदलत आहे. त्यामुळे नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्ती येण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. बदलते हवामान आणि त्यामुळे उद्भवणारी आपत्ती यावर संरचनात्मक उपाययोजना करण्यासाठी तसेच शहराच्या शाश्वत विकासासाठी हवामान व वातावरणीय बदलाच्या माहितीचे आदान प्रदान करण्यासाठी दोन्ही संस्थांमध्ये झालेला सामंजस्य करार भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार असल्याचे आयुक्त सिंह यांनी सांगितले. या करारानुसार भारतीय हवामान खाते पिंपरी चिंचवड महापालिकेला वेळोवेळी शहरातील हवामानाचे अंदाज तसेच त्याबाबत करावयाच्या उपाययोजना याबाबत सूचना देणारी माहिती पुरवणार आहे. या माहितीचा उपयोग महापालिकेला विविध उपाययोजना आणि नियोजन करण्यासाठी होणार असल्याचे आयुक्त सिंह यावेळी म्हणाले.

### काय आहे एक्स-बँड डॉप्लर वेदर रडारचे तंत्रज्ञान

» "एक्स-बँड डॉप्लर वेदर रडार" एक अत्याधुनिक स्वदेशी रडार प्रणाली आहे. या प्रणालीचे कार्यपरिक्षेत्र सुमारे १०० किलोमीटर परिघात असणार आहे. यामध्ये पिंपरी चिंचवड शहरासह पुणे जिल्ह्याच्या संपूर्ण क्षेत्राचे, गड परिसर आणि आसपासच्या भागांचा समावेश असणार आहे. आपत्तीजनक हवामान घटनांची वास्तविक-समय निरीक्षण क्षमता, अत्याधिक पाऊस, वादळ, गारपीट, इत्यादींचा अभ्यास करण्यासाठी या रडारप्रणालीद्वारे महत्त्वपूर्ण माहिती मिळणार आहे. पिंपरी चिंचवड शहरावर परिणाम करणाऱ्या वातावरणीय घटकांची माहिती महापालिकेला वेळोवेळी पुरवली जाणार असल्याचे के. एस. होसाळीकर यांनी यावेळी सांगितले.

## हिवाळी अधिवेशनात बांधकाम कामगार काढणार नागपूरमध्ये मोर्चा

**26 लाखांपेक्षा अधिक कामगारांचे अर्ज त्वरित निकाली काढा : काशिनाथ नखाते**

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील बांधकाम कामगारांची नोंदणी प्रक्रिया अत्यंत क्लिष्ट पद्धतीने करण्यात आली असून विधानसभेच्या आचारसंहितेपासून अजूनही सर्व कामकाज बंद आहे तसेच ऑनलाइन पद्धतीने काम सुरू होण्यासाठी तसेच महाराष्ट्र राज्यातील २६ लाख बांधकाम कामगारांचे अर्ज तात्काळ निकाली काढावेत या व विविध मागण्यासाठी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये बांधकाम कामगारांचा मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहिती कामगार नेते काशिनाथ नखाते यांनी दिली .



महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार समन्वय समिती, कष्टकरी संघर्ष महासंघतर्फे राष्ट्र सेवा दल पुणे येथील सभागृहामध्ये महाराष्ट्र राज्यातील बांधकाम कामगारांच्या प्रमुख प्रतिनिधीची राज्यव्यापी बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी येत्या हिवाळी अधिवेशनात नागपूर आंदोलनाचा ठरावासह इतर ठरावही मंजूर करण्यात आले .

यावेळी साथी सागर तायडे, कॉ. शंकर पुजारी, कामगार नेते काशिनाथ नखाते,नवी मुंबईच्या विनिता बाळेकुंद्री, वर्धाचे प्रशांत रामटेके, यवतमाळचे रत्नदीप डोके,अकोल्याचे परशुराम मेश्राम, नांदेडचे परमेश्वर मठपती सोलापूरचे प्रदीप परकाळे, कोल्हापूरचे राजू सुतार,बीडच्या अनिता जाधव,बुलढाण्याचे चांद शाहा, लातूरचे विजय जाधव यांचे सह विविध प्रतिनिधी उपस्थित होते. प्रस्तावना सागर तायडे यांनी तर आभार राजेश माने यांनी मानले. महाराष्ट्र राज्यातील नोंदणी कामे तालुक्याला केंद्र निर्माण केलेले असून सदरच्या ठिकाणातून किरकोळ प्रमाणात नोंदणी होणार आणि पिळवणूक होणार असून प्रत्येक जिल्ह्यातील कामगारांची संख्या पाहिली असता नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी खुल्या पद्धतीने होणे अत्यंत गरजेचे आहे. असे न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला. विविध जिल्हा प्रतिनिधींनी आपल्या समस्या यावेळी मांडल्या.

## आमचे देखभाल दुरुस्ती शुल्क परत द्या

**गाळेधारकांची पीएमआरडीएकडे मागणी : सेक्टर 30 येथील कन्व्हेनियंस शॉपिंग सेंटरला सुविधांची प्रतीक्षा**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) सेक्टर ३० येथील कन्वेनियंस शॉपिंग सेंटरमधील गाळ्यांची देखभालदुरुस्ती करण्यासाठी गाळेधारकांना शुल्क आकारण्यात आले. परंतु, मागील एक वर्षात देखभाल दुरुस्तीसह कोणत्याही सुविधा देण्यात आल्या नाहीत. यामुळे गाळेधारकांनी पीएमआरडीएवर नाराजी व्यक्त करत प्रतिगाळा जमा केलेले देखभाल दुरुस्ती शुल्क परत घेण्यासाठी पीएमआरडीएकडे अर्ज केला आहे.




पिंपरी-चिंचवडसह पुणे जिल्ह्यात पीएमआरडीए अंतर्गत विविध विकास प्रकल्प विकसित केले जात आहेत. सेक्टर १२ येथील साडेसहा हजार घरांचा प्रकल्प सध्या वेगाने सुरु आहे. त्याचबरोबर सेक्टर ३० येथे कन्व्हेनियंस शॉपिंग सेंटर विकसित करण्यात आले असून त्यातील गाळ्यांचा ताबा मागील वर्षी देण्यात आला. शॉपिंग सेंटरमधील गाळ्यांच्या दैनंदीन देखभाल दुरुस्तीसह गाळेधारकांना तत्सम सुविधा देण्यासाठी ६४ हजार ५०० इतके शुल्क आकारण्यात आले. या कामासाठी गाळेधारक आणि पीएमआरडीए यांच्यात कायदेशीर करार झाला. शुल्क जमा करुन दहा ते अकरा महिने उलटले तरी पीएमआरडीएकडून कसल्याही सुविधा पुरवल्या नसल्याची तक्रार गाळेधारकांनी केली आहे.

शॉपींग सेंटरमधील विद्युत वापराचे कॉमन वीज बिल महावितरणशी संबंधित विद्युत कार्यालयात जमा केले नाही. परिणामी, महावितरणकडून २३ नोव्हेंबर २०२४ रोजी विद्युत प्रवाह खंडित केला आहे. सोसायटी स्थापन करण्याची प्रक्रिया करुन देण्याचे आश्वासन दिले होते. अद्याप ती प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. गाळेधारकांच्या मालमत्तेची पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडे नोंद केलेली नाही. शॉपिंग सेंटरमध्ये हक्काचे नळ कनेक्शन नाही. त्याबाबत पालिकेकडे पत्रव्यवहार केलेला नाही. ऑन ग्रीड मीटर नसल्यामुळे सोलर यंत्रणा कार्यारत नाही. लिफ्टसाठी बॅकअप बॅटरी उपलब्ध नाही. प्रत्येक मजल्यावर बाल्कनीमध्ये पाणी साचते. परिणामी, दुकानांमध्ये पाणी शिरत असून त्याचा गाळाधारकांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. पावसाच्या पाण्याला आऊटलेट करुन दिलेला नाही.

# पीएमपीच्या तिकीट दरात होणार वाढ!

## संचलनातील तोटा 706 कोटींच्या पुढे, 2014 पासून तिकीट दरात वाढ न झाल्याची प्रशासनाची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये सार्वजनिक वाहतूक बस सेवा पुरवणाऱ्या पीएमपीची संचलन तूट गेल्या काही वर्षांपासून सातत्याने वाढत आहे. अनेक पीएमपी बस मार्ग तोट्यात सुरू असून देखभालीचा खर्चही वाढत आहे. यंदा पीएमपीचा संचलन तोटा ७०६ कोटींहून अधिक झाला आहे. त्यामुळे आता पीएमपीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा विचार केला जात आहे.

या दोन शहरांमधून दररोज किमान दहा लाख प्रवासी पीएमपीने प्रवास करतात. याआधी २०१४ मध्ये पीएमपीच्या तिकिट दरात शेवटची वाढ करण्यात आली होती. असे महापालिका प्रशासनाने सांगितले. गेल्या दहा वर्षांत अनेक वेळा तिकीट दर वाढवण्याचे प्रयत्न झाले. मात्र, नागरिकांनी विरोध केल्यानंतर तो मागे घेण्यात आला. आता पीएमपीची यंदाची तूट भरून काढण्यासाठी तिकीट दरात वाढ करण्याचा विचार केला जात असल्याचे महापालिकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.




### पीएमआरडीएच्या हद्दीतील सेवेमुळे वाढतेय तूट

» पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीव्यतिरिक्त पीएमआरडीए हद्दीतील १२२ मार्गांवर पीएमपी प्रशासनाकडून ५०३ बसद्वारे परिवहन सेवा पुरविली जात आहे. पीएमआरडीएच्या हद्दीत अनेक लांब पल्ल्याचे मार्ग आहेत. या कारवाईसाठी पीएमपीला मोठा खर्च करावा लागत आहे. हा खर्च कमी करण्यासाठी पीएमआरडीएच्या हद्दीतील सेवा मार्ग गेल्या वर्षी बंद करण्यात आले होते. दरम्यान, तत्कालीन पालकमंत्र्यांच्या आदेशानंतर ही सेवा पुन्हा सुरू करण्यात आली. गेल्या वर्षी पीएमपीने पीएमआरडीएकडे १८७ कोटी रुपयांची मागणी केली होती. यंदा पीएमपीने पीएमआरडीएकडे २२२ कोटी रुपयांची मागणी केली आहे. मात्र, पीएमपीआरडीए ही केवळ विकास प्राधिकरण असल्याने ऑपरेशनल तूट भरण्याची जबाबदारी टाळली जात आहे. परिणामी ही तूट वाढत आहे. त्यामुळेच यंदा पीएमपीच्या तिकिट दरात वाढ होण्याची शक्यता आहे.

### भाडे वाढल्यास आंदोलनाचा इशारा

» पीएमपी प्रशासनाच्या चुकीच्या नियोजनामुळे पीएमपी तोट्यात आहे. एकूण खर्चाच्या ५० ते ६० टक्के प्रशासकीय खर्च असतो. पीएमपीचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करण्याऐवजी देखाव्यासाठी खर्च केला जात आहे. एखादा अधिकारी चांगले काम करतो तेव्हा त्याची बदली होते. भाडेवाढ करण्याचा विचार प्रशासन करत असेल तर आमचा विरोध असेल. बससेवा सुरळीत केल्यास भाडे वाढवण्याची गरज भासणार नाही. भाडे वाढल्यास प्रवाशांची संख्या आणखी कमी होईल. गेल्या अनेक वर्षांपासून प्रवासी संख्या वाढवण्यात पीएमपीला यश आलेले नाही. प्रवाशांची संख्या का वाढत नाही, याचा विचार केला जात नाही. पीएमआरडीएच्या हद्दीतील सेवेमुळे तोटा होत असेल तर ते मार्ग बंद करावे. तुमचे कार्य फक्त पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरापुरते मर्यादित आहे. पीएमआरडीएअंतर्गत शासनाचे एसटी महामंडळ आहे, असे पीएमपी प्रवासी मंचचे अध्यक्ष जुगल राठी यांनी सुनावले.

पीएमपीसाठी गेली काही वर्षे अत्यंत कठीण गेली आहेत. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीसह पीएमआरडीए हद्दीत सुमारे ३९४ मार्गांवर पीएमपीद्वारे १,७०० बसेसद्वारे सेवा दिली जाते. मात्र, गेल्या दहा वर्षांत पीएमपीची परिसंचरण तूट सातत्याने वाढत आहे. विशेषत: कोविडच्या काळात पीएमपी सेवा पूर्णपणे बंद झाल्याने प्रवाशांची संख्या घटली होती. या काळात पीएमपीच्या उत्पन्नावर सर्वाधिक परिणाम झाला. त्यामुळे २०२१-२२ मध्ये पीएमपीचा तोटा ७१८ कोटी रुपयांच्या पुढे गेला होता. या नुकसानीच्या रकमेचा भार पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेने उचलला आहे.

# स्कूल व्हॅन, बसेसची झडती; शहर-उपनगरांत आरटीओची पथके ॲक्टिव्ह

## पुणे प्रादेशिक परिवहन विभागाकडून स्कुल व्हॅन तपासणी मोहिमेला सुरुवात केली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकांची लगबग संपताच पुणे प्रादेशिक परिवहन विभागाकडून स्कुल व्हॅन तपासणी मोहिमेला सुरुवात केली आहे. खराडी परिसरात स्कूल व्हॅनला लागलेल्या आगीची घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पथकांची संख्या वाढवून आरटीओने सर्व स्कूल व्हॅन, बस तपासणी सुरू केली.



खराडी परिसरात आग लागलेली स्कूल व्हॅनची सर्व कागदपत्रे पूर्ण होती. या स्कूल व्हॅनचा फिटनेस परवाना ऑगस्ट २०२५ पर्यंत आहे. तर, पीयूसी २०२७ पर्यंतची आहे. या स्कूल व्हॅनचा आग का लागली, याची तपासणी केली जात आहे. या घटनेपूर्वी देखील स्कूल व्हॅनची सतत तपासणी केली जात होती. आताही तपासणीचा वेग वाढविण्यात आला आहे. शहर आणि जिल्ह्यात पथकाकडून तपासणी व कारवाई सुरू आहे, अशी माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले यांनी दिली.

दरम्यान, पुणे आरटीओने ११ महिन्यांत एकूण दीड हजार स्कूल व्हॅनची तपासणी केली आहे. त्यावेळी ६०१ स्कूल व्हॅन दोषी आढळून आल्या आहेत. त्यांच्याकडून २१ लाख ७९ हजार रुपये दंड वसूल केला आहे. तसेच, न्यायालयने चार स्कूल व्हॅनवर कारवाई करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली आहे. या अकरा महिन्यांत स्कूल व्हॅनवर एकूण २१ लाख ९९ हजारांची दंडात्मक कारवाई केली आहे.

# अधिकारी नेमून नगरपरिषद हद्दीतच सुविधा द्या; विभागीय आयुक्तांचे महापालिकेला आदेश

## फुरसुंगी आणि उरुळी देवाची या दोन्ही गावांतील नागरी सुविधांचे हस्तांतरण टप्प्याटप्प्याने नगर परिषदेकडे केले जाणार

**पुणे | प्रतिनिधी**

फुरसुंगी आणि उरुळी देवाची या दोन्ही गावांतील नागरी सुविधांचे हस्तांतरण टप्प्याटप्प्याने नगर परिषदेकडे केले जाणार आहे. मात्र, तो पर्यंत या गावांत महापालिकेनेच सुविधा देण्याचे शासन आदेश आहेत. पण, यासाठी गावकऱ्यांना हडपसर परिमंडळ कार्यालय आणि मुख्य इमारतीत यावे लागत आहे. त्यावर या सुविधा गावातच महापालिका अधिकारी नेमून उपलब्ध करून देण्याच्या सूचना विभागीय आयुक्तांनी महापालिका प्रशासनास केल्या आहेत.



या गावांसाठी शासनाने नेमलेल्या समितीच्या बैठकीत या सूचना करण्यात आल्या. शुक्रवारी विभागीय आयुक्त कार्यालयात ही बैठक पार पडली. या नगर परिषदेसाठीचा आकृतीबंध तत्काळ तयार करण्याच्या सूचना तेथील प्रशासकांना देण्यात आल्या आहेत. या दोन्ही गावांची स्वतंत्र नगर परिषद करण्यात आली असली, तरी पुढील काही महिने या गावांसाठीच्या सुविधांचे हस्तांतरण करण्यासाठी समिती नेमली आहे. या समितीने त्याचा कृती आराखडा शासनास सादर करायचा आहे.

मात्र, या समितीची एकही बैठक झालेली नव्हती. या गावांमधे सध्या महापालिकाच दैनंदिन सुविधा देत असली तरी त्याचे कामकाज हडपसर परिमंडळ कार्यालयातून चालत आहे. त्यामुळे नागरिकांना वारंवार या कार्यालयात जावे लागते. त्यामुळे या सुविधा गावातच मिळाव्यात, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. त्यानुसार महापालिकेने तातडीने ती व्यवस्था करावी, संबंधित विभाग प्रमुखांनी आवश्यक माहिती तसेच कागदपत्रांचे नगरपरिषद प्रशासकाकडे तत्काळ हस्तांतरण करावे, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

ऐन निवडणुकीच्या तोंडावर या दोन्ही गावांमधे मोठ्या प्रमाणात पाण्याची टंचाई जाणवली होती. त्यावरूनही या बैठकीत ग्रामस्थांनी तक्रारी केल्या आहेत. यावरून महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने गावांमध्ये तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना विभागीय आयुक्तांनी दिलेल्या आहेत. या गावांमध्ये प्रामुख्याने टँकरने पाणी दिले जात असून त्यांची संख्या कमी करू नये, अशा सूचनाही करण्यात आल्या आहेत.

# पीएमआरडीएमध्ये आणखी 80 कंत्राटी पदे भरणार

## प्रशासनाने मागवली रिक्त पदांची माहिती, विविध विभागात टप्प्याटप्प्याने होणार भरती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरणअंतर्गत मनुष्यबळ मिळवण्यासाठी कंत्राटी कंपनी नेमण्यात आली आहे. त्यानुसार टप्प्याटप्प्याने तसेच, विभागाला मागणीनुसार मनुष्यबळ पुरवण्यात येत आहे. सद्यस्थितीत केवळ १८५ कर्मचारी नेमण्यात आले आहेत. मात्र, कामाचा ताण वाढत असल्याने आणि प्राधिकरणातील विविध विभागांमध्ये मनुष्यबळाची कमतरता निर्माण झाल्याने आणखी ८० पदे कंत्राटी स्वरूपात भरली जाणार आहेत. त्यानुसार पहिल्या टप्प्यात अतिक्रमण निर्मूलन विभागामध्ये चाळणी पद्धतीने कर्मचारी नेमण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

पीएमआरडीए येथील कंत्राटी कर्मचाऱ्यांचा कालावधी संपुष्टात आला आहे. त्यामुळे दोन महिन्यांपूर्वी नव्याने बीव्हीजी या कंपनीला मनुष्यबळाचा ठेका देण्यात आला आहे. उपलब्ध मनुष्यबळावर प्रशासकीय कामाचा ताण पडत असून बाह्यस्त्रोतामार्फत कंत्राटी पध्दतीने भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. खासगी संस्थांमार्फत कंत्राटी कर्मचारी भरती केली जात आहे. संबंधित एजन्सीच्या माध्यमातून पीएमआरडीएच्या प्रशासकीय सेवेत अभियंतासह चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी कंत्राटी पद्धतीने भरण्यात येत आहेत.

मनुष्यबळ अपुरे पडत असल्यामुळे त्यांचे काम वेळेत होत नाही. त्यामुळे नागरिकांची नाराजी ओढवून घेण्याची वेळ पीएमआरडीए प्रशासनावर आलेली आहे. नागरिकांची प्रशासकीय कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी पीएमआरडीएने कंत्राटी कर्मचारी भरती प्रक्रिया हाती घेतली आहे. दरम्यान, यापूर्वी असलेल्या कंपनीचे जवळपास पावणेतीनशे कर्मचारी होते. मात्र, कंपनी बदलल्यानंतर नव्याने सर्व प्रक्रिया करण्यात आली. त्यामध्ये काही कर्मचाऱ्यांच्या सेवा संपुष्टात केल्या. मात्र, पुन्हा नव्याने कर्मचारी भरताना केवळ साठ टक्केच कर्मचारी घेतले होते. म्हणजेच १८५ कर्मचारी कंत्राटी स्वरूपात घेतले. मात्र, कामाचा ताण वाढल्याने आणखी काही पदे भरण्यात येणार आहेत. त्यानुसार आणखीन ८० पदांची भरती केली जाणार आहे.

पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरणअंतर्गत मनुष्यबळ मिळवण्यासाठी कंत्राटी कंपनी नेमण्यात आली आहे. त्यानुसार टप्प्याटप्प्याने तसेच, विभागाला मागणीनुसार मनुष्यबळ पुरवण्यात येत आहे. सद्यस्थितीत केवळ १८५ कर्मचारी नेमण्यात आले आहेत.




### अभियंतापदाची मोठी मागणी

» प्राधिकरण अंतर्गत अभियांत्रिकी, अतिक्रमण व निर्मूलन, प्रकल्प या विविध विभागांमध्ये अभियंता पदाची कमतरता आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यामध्ये अभियंता पदाची भरती केली जाणार आहे. त्या अनुषंगाने शुक्रवारी उमेदवार चाचणी देण्यासाठी कार्यालयात आले होते. त्याचप्रमाणे आणखी काही पदेदेखील भरण्यात येणार आहेत.

> विविध विभागांकडून रिक्त पदे व आवश्यक पदांची माहिती मागवण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने संबंधित कंपनीला ती माहिती देण्यात येत आहे. त्यानंतर उमेदवारांना बोलावून चाचणी घेण्यात आल्यानंतर कंत्राटी म्हणून नेमणूक करण्यात येणार आहे. आणखी ८० पदाची भरती होईल.
>
> - सुनील पांढरे, सह आयुक्त, प्रशासन, पीएमआरडीए.

# पिंपरी चिंचवड शहरातील बीआरटी मार्गाचे मोठ्या प्रमाणात विद्रुपीकरण; महापालिका अनभिज्ञ

## दुभाजकात टाकला जातोय कचरा, देखभालीअभावी मोठ्या प्रमाणात वाढली झाडीझुडपे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील वेगवेगळ्या मार्गावर असलेल्या बीआरटी रस्त्याची विविध कारणांनी दुरावस्था झालेली आहे. मार्गामध्ये टाकण्यात येणारा कचरा, जागोजागी वाढलेले झुडपे, भटकी जनावरांचा वावर, ठिकठिकाणी पडलेले खड्डे अन् तुटलेले बॅरिकेट्स यामुळे करोडो रुपये खर्च करून उभारण्यात बीआरटी मार्गाचे मोठ्या प्रमाणात विविध विद्रूपीकरण होत आहे. पीएमपीएमएल आणि पिंपरी चिंचवड महापालिका त्या दोघांमध्ये समन्वय नसल्याने या मार्गाची वाट लागलेली आहे.

किवळे ते औंध या मार्गावर असलेल्या बी आर टी मध्ये काळेवाडी परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जातो. तर, डांगे चौकामध्ये हा मार्ग खाजगी वाहने आणि रिक्षा चालकांनी व्यापलेला असतो. त्यामुळे या ठिकाणी बीआरटी मध्ये बस चालवताना चालकांना मोठी कसरत करावी लागते. वाकड रस्त्यावरती वळण घेत असताना या चौकात हमखास अपघात होतात. अनेकदा या मार्गाची डागडुजी करून देखील समस्या सुटलेली नाही.

भक्ती शक्ती-रावेत मार्गावर देखभालीकडे दुर्लक्ष होत असल्याने कोट्यवधी खर्च करून बांधण्यात आलेल्या बाह्यवळण मार्गाचे या प्रकारे विद्रुपीकरण होताना दिसत आहे. या मार्गावर पदपथावर बऱ्याच वृक्षांना संरक्षण जाळ्या नसल्याने ती झाडे गुरे, शेळ्या, मेंढ्या खात आहेत, अनेक उपद्रव्यांनी झाडांचे नुकसान करत आहेत. पदपथ व बीआरटी मार्गात नियमित सफाई होत नसल्याने जागोजागी कचरा पडला आहे. त्यामुळे देखभालीकडे उद्यान आणि आरोग्य विभागाचे दुर्लक्ष होत आहे का, असा सवाल नागरिक विचारत आहेत.

दुसरीकडे, देहू आळंदी ते काळेवाडी या मार्गावर बीआरटी रस्त्यावरती खाजगी वाहनांचा शिरकाव थांबलेला नाही. त्यातच या मार्गावर कचरा टाकला जातो. तसेच, येथील बॅरिगेटवर कपडे टाकले जातात. एखादा कपडा उडून वाहनाच्या चाकामध्ये अडकल्यास मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. त्याचप्रमाणे हा मार्ग इतर मार्गापेक्षा मोठा असल्याने बसा वेग अधिक असतो. परिणामी, अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अनेकदा या मार्गावर रिक्षा देखील थांबवल्या जातात.

बीआरटी विभागाचे कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड यांच्याशी संपर्क साधला असता, प्रतिक्रिया मिळू शकली नाही. करोडो रुपये खर्च करून उभारण्यात बीआरटी मार्गाचे मोठ्या प्रमाणात विविध विद्रूपीकरण होत आहे. पीएमपीएमएल आणि पिंपरी चिंचवड महापालिका त्या दोघांमध्ये समन्वय नसल्याने या मार्गाची वाट लागलेली आहे.



> चालायला जाताना पदपथावर जागोजागी कचरा व कपडे पडलेले असतात. पहाटेच्या वेळी मोठ्या प्रमाणात कचरा पडतो. अनेक बस थांब्यावरती थेट दुचाकी देखील पार्क केल्या जात होतो. तर, काही बीआरटी मार्गावरती खड्डे पडले आहेत.
>
> - संदेश पुजारी, ज्येष्ठ नागरिक, प्राधिकरण

# ऐन थंडीत सिंचनासाठी शेतकऱ्यांचे रात्री जागरण

## डिसेंबरमध्ये चार दिवस दिवसा तसेच, तीन दिवस रात्री साडे अकराला वीज येणार असल्याने मध्यान्ह रात्रीच्या काळात वीजपुरवठा

**पुणे | प्रतिनिधी**

रब्बी हंगामातील बहुतांश पेरणी आटोपली असून उर्वरित ठिकाणी पेरण्यांना वेग आलेला आहे. अशा काळात सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठ्याची शेतकऱ्यांना नितांत आवश्यकता निर्माण झालेली आहे. नोव्हेंबर महिन्यात, आठवड्यातील चार दिवस दिवसा; तर तीन दिवस रात्री नऊ वाजता शेतीसाठी वीज पुरवठा केला जात होता. आता डिसेंबरमध्ये चार दिवस दिवसा तसेच, तीन दिवस रात्री साडे अकराला येणार असल्याने मध्यान्ह रात्रीच्या काळात वीजपुरवठा मिळत असल्याने, शेतकऱ्यांना जागरण करावे लागत आहे.

रब्बी हंगामातील पिकांना सिंचन करण्याची एकच लगबग शेतकरीवर्गामध्ये सुरू आहे. पुरंदरच्या ग्रामीण भागात प्रकल्प आधारीत सिंचनाच्या सोयी कमी असल्याने बहुतांश रब्बी हंगामात संरक्षित पाण्याच्या पाळ्या या विहीर, बोअरवेलवरून कराव्या लागतात. यासाठी कृषिपंपाला वीजपुरवठा हवा आहे. सध्या आठवड्यातील तीन दिवस रात्री व चार दिवस दिवसा वीजपुरवठा केला जातो. त्यातही दिवसाच्या पुरवठ्यात अनेकवेळा तांत्रिक दोष निर्माण होऊन वीज खंडित राहण्याचे प्रमाण अधिक आहे. अशा अडचणीमुळे शेतकऱ्यांना सिंचन करण्यासाठी दिवस – रात्र सतर्क राहण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही.



### रात्री अकरा नंतर विहिरीवर कसे जायचे?

» मागील वर्षापासून पुरंदर तालुक्यातील दक्षिण-पूर्व भागात पाऊस सरासरीपेक्षा कमी झाला आहे. परतीच्या प्रवासाने हजेरी लावली. त्यामुळे पुरंदर तालुक्यातील दक्षिण-पूर्व भागातील काही ओढे- नाले, बंधारे, तलाव यामध्ये थोडाफार पाणीसाठा उपलब्ध झाला होता. यामुळेच परिसरात विहीर, बोअरवेल यांची पाणी पातळी वाढली. याच बरोबर शेताच्या बांधावर गवत व काटेरी झुडपे वाढली आहेत. जुन्या पायवाटांवरून चालताना दिवसा भिती वाटते. मंग रात्री अकरा नंतर विहिरीवर कसे जायचे या चिंतेत वृद्ध शेतकरी आहेत.

### वन्य प्राण्यांचाही त्रास..

» दिवसा वीज पुरवठ्याअभावी आठवड्यातील काही दिवस शेतकऱ्यांना रात्रीच्यावेळी जागरण करावे लागते. अनेक शेतशिवार वन्यप्राण्यांचा मोठ्या प्रमाणात वावर वाढला आहे. हे प्राणी पिकांना नुकसानकारक ठरतात तसेच शेतकऱ्यांसाठीही धोकादायक असतात. शेतकऱ्यांवर हल्ल्यांच्या घटना अधूनमधून होतच राहतात.

### कृषी पंपाचे वेळापत्रक

» दिवस पाळी चार दिवस – सकाळी 7:35 ते संध्याकाळी 3:35 = 8 तास.

» रात्रपाळी तीन दिवस- रात्री 11:35 (23:35) ते सकाळी 7:35 = 8 तास.

“ आम्हाला 24 तासांमध्ये 8 तास वीज मिळते. शुक्रवार, शनिवार, रविवार या तीन दिवशी कृषी पंपाची वीज रात्री 11. 35 वाजता वीज येते व सकाळी 07. 35 जाते. दिवसभर गुरा ढोरांची कामं उरकून रात्री आठपर्यंत दुध डेअरीला जातं. त्यानंतर नऊ वाजेपर्यंत जेवणं होत. आता नऊ ते रात्री साडेअकरा वाजेपर्यंत जागे राहणे का ? डुलका काढून पुन्हा मोटर चालू करायची. ऐन थंडीत कुडकुडत शेतात पाणी द्यावे लागत आहे.

\- जयवंत भुजबळ, वाल्हे

# शिरूर शहरातील दर्जाहिन रस्त्याला टक्केवारीची किड

## रस्त्याच्या दुरवस्थेबाबत अनेकदा आंदोलने, उपोषणे झाली, त्यानंतर यावर तात्पुरत्या स्वरुपात रस्त्यांना मलमपट्टी केलेली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर शहरातील अंतर्गत रस्त्याची वाट लागली असून शिरूर नगरपरिषद याकडे डोळेझाक करीत असल्याचा आरोप नागरिक करीत आहे. रस्त्याच्या दुरवस्थेबाबत अनेकदा आंदोलने, उपोषणे झालेली आहेत. त्यानंतर यावर तात्पुरत्या स्वरुपात रस्त्यांना मलमपट्टी देखील केलेली आहे. आजही त्याच पद्धतीची मलमपट्टी आहे. पाबळ फाटा ते विद्याधाम शाळा हा रस्ता चांगल्या दर्जाचा आहे. शहराला शोभा देणारा झाला आहे. परंतु, याउलट पाबळ फाटा ते रिलायन्स पेट्रोल पंप बायपासपर्यंतचा व विद्याधाम शाळा ते सतराकमानी पूल रस्त्यावर मात्र अन्याय झाला आहे.

नगरपरिषदेकडे जाणाऱ्या रस्त्यावरच मोठे खड्डे पडले आहे. ही लाजीरवाणी बाब आहे.

रस्त्यावरील पडलेल्या खड्डयांबाबत अद्यापर्यंत कोणतेही ठोस पावले उचलली नाहीत, तात्पुरता स्वरूपात थोडी डागडुजी केली जाते. परत रस्ता खराब होतो. रस्त्यावर कायमस्वरूपी तोडगा निघणे गरजेचे आहे. रस्त्यावरील खड्डयांमुळे अपघात होऊन अनेक नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. अनेक जणांना कायमचे अपंगत्व देखील स्वीकारावे लागले आहे. खड्डयांमुळे नागरिक इतके त्रस्त झाले आहेत की, त्यांना त्यांचा जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

ररस्त्यावरून ये – जा करणाऱ्या शिरूर शहरातील नागरिकांची संख्या देखील मोठ्या प्रमाणात वाढली आहे. लहान मुलांना बागेत घेऊन येणे, वॉकींग करण्यासाठी बाहेर पडणे, इतर कार्यक्रमासाठी खड्डे पडलेल्या रस्त्याने प्रवास करणे कठीण झाले आहे. खराब, चाळण झालेल्या, गतिरोधक नसणाऱ्या, पाणीसाठा होणाऱ्या खड्डयांमुळे अजूनही मोठी जीवितहानी होण्याची तसेच नाहक बळी जाण्याची देखील शक्यता आहे.

शहरातील अंतर्गत रस्त्याची वाट लागली असून शिरूर नगरपरिषद याकडे डोळेझाक करीत असल्याचा आरोप नागरिक करीत आहे. रस्त्याच्या दुरवस्थेबाबत अनेकदा आंदोलने, उपोषणे झालेली आहेत. त्यानंतर यावर तात्पुरत्या स्वरुपात रस्त्यांना मलमपट्टी देखील केलेली आहे. आजही त्याच पद्धतीची मलमपट्टी आहे. पाबळ फाटा ते विद्याधाम शाळा हा रस्ता चांगल्या दर्जाचा आहे.



### मनसे रांगोळी स्पर्धा भरविणार

» रस्त्याच्या दुरुस्तीबाबत ठोस पावले न उचलल्यास रस्त्यांवर “भव्य रांगोळी स्पर्धा ” आयोजित करण्यात येणार आहे. असे लेखी निवेदन शिरूर मनसेने नगर परिषदेला दिले आहे. यावेळी जनहित विधी मनसेचे जिल्हाध्यक्ष अॅड. स्वप्नील माळवे, विधिचे अॅड. कैलास गाडीलकर, अॅड. प्रतीक लोखंडे, माजी शहाराध्यक्ष संदीप कडेकर, महिला आघाडीच्या डॉ. वैशाली साखरे, शाम पवार, विकास बोरुडे, मिलिन परदेशी, परेश सूपते, समद काझी व कार्यकर्ते उपस्थित होते.